आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – दुपारी १.३० वाजता

२१ नोव्हेंबर २०२३ –मंगळवार

**ठळक बातम्या**

- पहिल्या जागतिक मत्स्यव्यवसाय परिषदेला आज गुजरातमधे अहमदाबादच्या सायन्स सिटीत प्रारंभ

- भारत - ऑस्ट्रेलिया परराष्ट्र व्यवहार मंत्री स्तरावर १४ वा परराष्ट्र मंत्रीस्तरीय संवाद आज नवी दिल्लीत होणार

- इस्राएलकडून लष्कर ए तय्यबा ही संघटना दहशतवादी घोषित

- संयुक्त महाराष्ट्र चळवळीतल्या हुतात्म्यांना राज्याची आदरांजली

**आणि**

- आंतरराष्ट्रीय बिलियर्ड अजिंक्यपदासाठी भारताच्या पंकज अडवाणी आणि सौरव कोठारी या दोन खेळाडूंमधे आज लढत

**<><><><><><>**

पहिल्या जागतिक मत्स्यव्यवसाय परिषदेला आज गुजरातमधे अहमदाबादच्या सायन्स सिटीत प्रारंभ झाला. केंद्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंत्री परशोत्तम रुपाला यांच्या हस्ते परिषदेचं उद्घाटन झालं. उद्घाटन सत्राला गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री डॉ. एल मुरुगन आणि डॉ. संजीव कुमार बल्यान यांच्यासह सुमारे १० देशांचं उच्चस्तरीय शिष्टमंडळ, आंतरराष्ट्रीय संस्था तसंच मत्स्य व्यवसाय संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जागतिक मत्स्यव्यवसाय विकास दिनाचं औचित्य साधून ही पहिली वहिली परिषद आयोजित करण्यात आली आहे. मत्स्यशेतीसाठीचे जलाशय भाड्याने देण्याची सुविधा देणाऱ्या पोर्टलचं उद्घाटन गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी केलं. तर मत्स्यशेती आणि मत्स्यव्यवसायाशी संबंधित प्रदर्शनाचं उद्घाटन केंद्रीय मंत्री रुपाला यांच्या हस्ते झालं. घोळ हा गुजरातचा राज्य मासा म्हणून घोषित करण्यात आला. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत विविध मत्स्य उद्योगाशी संबंधित घटकांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणण्यात आलं आहे. मत्स्यपालन तंत्रज्ञान, अत्याधुनिक मत्स्यपालन आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रातले नाविन्यपूर्ण उपक्रम आदींची सविस्तर माहिती या परिषदेत उपलब्ध करून दिली जाणार आहे. देशातून आणि परदेशातून मिळून सुमारे पाच हजार प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर आणि ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री पेनी वाँग यांच्यात आज नवी दिल्ली इथं १४ वा परराष्ट्र मंत्रीस्तरीय संवाद होणार आहे. यावेळी परस्पर नेत्यांमध्ये सर्वसमावेशक भागीदारी तसंच प्रादेशिक आणि जागतिक पातळीवरील समान मुद्द्यांवर चर्चा होईल. दोन्ही नेत्यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह तसंच ऑस्ट्रेलियाचे संरक्षण मंत्री रिचर्ड मार्ल्स यांच्याबरोबर काल भेट घेऊन विविध विचारांची देवाणघेवाण केली. दोन्ही देशांमध्ये २००९ पासून परस्पर धोरणात्मक भागीदारीची प्रक्रिया सुरु असून २०२० पर्यंत  सर्वसमावेशक भागीदारी

वृद्धिंगत झाली असल्याचं यावेळी नमूद करण्यात आलं. भारत ऑस्ट्रेलियाचा सहावा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असून उभय देशांमधल्या व्यापारात ४१ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

**<><><><><>**

इस्त्राएलने लष्कर ए तय्यबा या संघटनेला दहशतवादी घोषित केलं आहे. २६ नोव्हेंबर २००८ होजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला १५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त ही घोषणा केल्याचं इस्त्राएलच्या दूतावासाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. ही घोषणा इस्त्राएल सरकारनं भारताच्या विनंतीवरुन केली नसून आपणहून केली असल्याचंही पत्रकात म्हटलं आहे. लष्कर ए तय्यबाचा हा हल्ला अत्यंत क्रूर आणि घृणास्पद कृत्य असून आजही शांतिप्रिय देशांसाठी निंदनीय असल्याचं इस्त्राएलनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणूक मतदानाला अवघे काही दिवस उरले असल्यानं राजस्थान आणि तेलंगणमध्ये प्रचार शिगेला पोहोचला आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष प्रयत्न करीत आहेत. प्रमुख प्रचारकांच्या सभा, रोड शो धडाक्यात सुरू आहेत.

राजस्थानात प्रचारासाठी तीनच दिवस राहिले असून भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज अंता, कोटा शहर आणि करौली मतदारसंघात जाहीर सभा घेणार आहेत. त्यानंतर संध्याकाळी जयपूरमधे

त्यांचा रोड शो होईल. त्याकरता चार किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर विशेष तयारी करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा धोद, फतेहपूर आणि श्रीडुंगरगड इथं प्रचार सभा घेतील. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, पियुष गोयल, अर्जुन राम मेघवाल, आणि गजेंद्र सिंग शेखावत तसंच भाजपा शासित राज्यांचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, हिमंत बिस्व सरमा, शिवराज सिंग चौहान राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे सिंदिया यांच्या ही प्रचारसभा होणार आहेत.

तर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी अध्यक्ष राहुल गांधी ज्येष्ठ नेते सचिन पायलट यांच्यासह इतर नेत्यांच्या प्रचारसभा आज होणार आहेत.

**<><><><><>**

आज जागतिक दूरचित्रवाणी दिन. दूरचित्रवाणीच्या दृश्य माध्यमाचा जनमानसावर वाढता प्रभाव अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. या दिनाची यंदाची संकल्पना आहे माध्यमाची ‘उपलब्धता’. १९९६ मध्ये, संयुक्त राष्ट्रांनी या माध्यमाचं महत्व लक्षात घेऊन या दिवशी प्रथम दूरचित्रवाणी मंच आयोजित केला होता. तेव्हापासून दरवर्षी २१ नोव्हेंबर हा दिवस ‘जागतिक दूरचित्रवाणी दिन’ म्हणून साजरा केला जातो.

**<><><><><>**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी बलिदान देणाऱ्या १०७ हुतात्म्यांना आज आदरांजली वाहण्यात येत आहे. मुंबईत हुतात्मा चौक इथल्या हुतात्मा स्मारकाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं. ‘या १०७ हुतात्म्यांच्या बलिदानामुळेच मुंबई महाराष्ट्राला मिळाली असून त्यांचं बलिदान कधीही विसरता येणार नाही’, अशा शब्दात त्यांनी श्रद्धांजली वाहिली. शहिदांना केवळ अभिवादन करून उपयोग नाही तर आपलं राज्य प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर नेऊन त्यांचा नावलौकिक सदैव अबाधित ठेवणं, हीच या हुतात्म्यांना खरी आदरांजली ठरेल, असं ते म्हणाले.........

**होल्ड बाईट - मुख्यमंत्री**

कार्यक्रमाला विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

ईफ्फी म्हणजेच भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात इंडियन पॅनोरमाला सुरूवात होणार आहे. माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग सिंह ठाकूर इंडियन पॅनोरमाच्या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. या विभागात २५ चित्रपट आणि २० कथाबाह्य चित्रपट दाखवण्यात येतील. आनंद एकरसाही दिग्दर्शित मल्याळम भाषेतला ‘अट्टम’ हा इंडियन पॅनोरमा

विभागातला पहिला चित्रपट असेल. तर कथाबाह्य विभागात मीना लोंगजम दिग्दर्शित 'अँड्रो ड्रीम्स' हा माहितीपट सुरुवातीला दाखवण्यात येईल. इंडियन पॅनोरमा विभागात दाखवल्या जाणाऱ्या इतर चित्रपटांमध्ये विवेक अग्निहोत्री दिग्दर्शित हिंदी चित्रपट 'द व्हॅक्सिन वॉर', ऋषभ शेट्टी दिग्दर्शित कन्नड चित्रपट 'कांतारा' आणि कौशिक गांगुली दिग्दर्शित बंगाली चित्रपट 'अर्धांगिनी' यांचा समावेश आहे. यावेळी अनुराग सिंह ठाकूर यांच्या हस्ते 'सेव्हन्टी फाईव्ह क्रिएटिव्ह माइंड्स ऑफ टुमारो' या तरुण कलाकारांसाठीच्या विशेष उपक्रमाचंही उद्घाटन करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

कतार मधल्या दोहा इथ सुरु असलेल्या आंतरराष्ट्रीय बिलियर्ड अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्या पंकज अडवाणी आणि सौरव कोठारी या दोन्ही खेळाडूंनी प्रवेश केला आहे. या स्पर्धेची अंतिम फेरी आता या दोघांमध्ये होणार आहे. दोहा इथ काल झालेल्या उपांत्य सामन्यात यापूर्वी २५ वेळा विजेतपद पटकावलेला भारतीय बिलियर्ड खेळाडू पंकज अडवाणी याने भारताच्याच रुपेश शाह याचा पराभव केला तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात सौरव कोठारी याने ध्रुव सीतवाला याचा पराभव केला.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियासोबतच्या वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेसाठी काल भारतीय संघ जाहीर करण्यात आला. फलंदाज सुर्यकुमार यादव या संघाचा कर्णधार असेल तर पाच सामन्यांच्या मालिकेतल्या पहिल्या तीन

सामन्यांसाठी ऋतुराज गायकवाडची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. उर्वरित दोन सामन्यांसाठी श्रेयस अय्यर भारतीय संघाचा उपकर्णधार असेल. रोहित शर्मा, विराट कोहली, मोहम्मद शमी आणि जसप्रीत बुमराह या वरीष्ठ क्रिकेटपटूंना या मालिकेत विश्रांती देण्यात आली आहे.

**<><><><><><>**

उत्तराखंड राज्यात उत्तरकाशी इथं सिल्क्यारा बोगद्यात अडकलेल्या ४१ कामगारांना सुरक्षित बाहेर काढण्याचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

बोगद्यात अडकलेल्या कामगारांना वाचवण्याचं काम जलदगतीनं व्हावं यासाठी बोगद्याच्या वर मोठ्या आकाराचं ड्रिलिंग मशीन नेलं आहे. बोगद्याच्या आत एंडोस्कोपीक फ्लॅक्सी कॅमेरा सोडला असून त्याच्या माध्यमातून आत अडकलेल्या कामगारांशी मदत पथक संवाद साधत आहे. बोगद्यात अडकलेले कामगार सुरक्षित असल्याचंही या कॅमेऱ्यातून दिसत असल्याचं सांगण्यात आलं.

आंतरराष्ट्रीय बोगदा आणि भूमिगत स्थळ संघटनेचे अध्यक्ष अर्नोल्ड डिक्स दुर्घटनास्थळी पोहोचले आहेत. बोगद्यात अडकलेल्या सर्व कामगारांना सुरक्षितपणे बाहेर काढलं जाईल,असं डिक्स यांनी सांगितलं. बचाव पथकानं बोगद्याच्या आत सहा इंचाचा पाईप टाकला असून त्यातून अडकलेल्या कामगारांना जेवण, पाणी, प्राणवायू,औषध **तसंच इतर**

आवश्यक वस्तूंचा पुरवठा केला जात आहे. हे सर्व कामगार १२ नोव्हेंबरपासून बोगद्याच्या आत अडकले आहेत.

दरम्यान, कामगारांना वाचवण्यासाठी होत असलेल्या मदतकार्याची माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्याशी दूरध्वनीवरून घेतली. बोगद्यात अडकलेल्या सर्व कामगारांना सुरक्षित बाहेर आणण्याला प्राधान्य असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तीन बँकांना दंड ठोठावला आहे. नाशिक मर्चंट सहकारी बँकेला फसवणुकीच्या तक्रारी दाखल करण्यात दिरंगाई करण्यावरुन तसंच ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता कमीत कमी शिलकीच्या रकमेवरुन दंड आकारल्याप्रकरणी ४८ लाख ३० हजारांचा दंड आरबीआयनं ठोठावला आहे. मेहसाणा अर्बन बँकेला अपात्र विश्वस्त संस्थांची बचत खाती उघडल्याप्रकरणी १५ लाख रुपये तर सांगली सहकारी बँकेला संचालकांच्या नातेवाईकाच्या कर्जाची पुनर्रचना करण्यावरुन २ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या तिन्ही बँकांना आरबीआयनं आधी नोटीस पाठवली होती मात्र त्याला समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे दंडात्मक कारवाई केल्याचं आरबीआयनं म्हटलं आहे.